**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळांतील विभागीय सचिव या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या “शिक्षणाधिकारी व तत्सम” संवर्गातून भरण्यात येणाऱ्या पदास देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्र.आबंध-२०२५/प्र.क्र.६६/प्रशा-५,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- २४ एप्रिल, २०२६.

**वाचा**:- १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.-संकीर्ण १००२/(१५९/०२/प्रशा-५, दिनांक १७.०३.२००३.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.-संकीर्ण २४१३/प्र.क्र.५०/१३/प्रशा-५, दिनांक १८.११.२०१३.
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.आबंध-२०२५/ई-११४११२६६/प्रशा-५, दिनांक २३.०६.२०२५.
४) आयुक्त (शिक्षण), पुणे यांचे पत्र क्र. शिआका/२०२५-२६/९/आस्था-ब-(१२३)/ दिनांक ०९.०४.२०२६.

**प्रस्तावना :-**

शालेय शिक्षण विभागाचा आकृतीबंध दि.१७.०३.२००३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला आहे. तसेच, या विभागांतर्गत कार्यरत सर्व संचालनालयांमध्ये प्रभावीपणे समन्वय साधण्यासाठी व शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी एकत्रितपणे उपाययोजना करण्यासाठी दि.१८.११.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाची निर्मिती करण्यात आली आहे.

राज्यात नवीन शैक्षणिक धोरण २०२० ची यशस्वी अंमलबजावणी करण्याकरीता विभागांतर्गत मंजूर शिक्षण सहसंचालक/उपसंचालक संवर्गातील पदांचे कामाच्या आवश्यकतेनुसार फेरवाटप होणे गरजेचे असल्याने, दिनांक २३.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळांतील शिक्षण उपसंचालक या संवर्गातील विभागीय सचिव या ९ मंजूर पदांचे स्थानांतरण शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, शिक्षण संचालक (माध्यमिक), शिक्षण संचालक (प्राथमिक), योजना संचालनालय पुणे या राज्यस्तरीय कार्यालयांमध्ये व शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय येथे तसेच महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, छत्रपती संभाजीनगर (मिपा) येथील संचालक (सहसंचालक समकक्ष) पदाचे स्थानांतरण महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (बालभारती) येथे करण्यात आले आहे. ३

महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ मधील कलम २१, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे विनियम, १९७७ मधील नियम क्र.५९, क्र.७ (२) तसेच नियम क्र.१०६ मधील तरतुदी पाहता, विभागीय सचिव या पदास प्रदान करण्यात आलेल्या अधिकार व कर्तव्यांमुळे सदर पद विभागीय मंडळांकरीता महत्त्वाचे व आवश्यक आहे. त्यामुळे, विभागीय मंडळांमधील कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सद्यस्थितीत अस्तित्वात असलेले विभागीय सहसचिव हे पद रद्द करुन “शिक्षणाधिकारी व तत्सम” (वर्ग-१, एस-२०: ५६१००-१७७५००) या संवर्गातील पदास विभागीय सचिवांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

विभागीय मंडळांमधील कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेले विभागीय सहसचिव हे पद रद्द करुन "शिक्षणाधिकारी व तत्सम" (वर्ग-१, एस-२०: ५६१००-१७७५००) या संवर्गातील पदास विभागीय सचिवांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या देण्यास याद्वारे खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे:-

१. विभागीय मंडळात विभागीय सचिव हे पद यापुढे "शिक्षणाधिकारी व तत्सम" (वर्ग-१, एस-२०: ५६१००-१७७५००) या संवर्गातून भरण्यात येईल व सदर पदास विभागीय सचिव या पदाचे अधिकार राहतील.

२. विभागीय सचिव "शिक्षणाधिकारी व तत्सम" (वर्ग-१, एस-२०: ५६१००-१७७५००) या पदास महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे विनियम, १९७७ मधील तरतुदींनुसार विहीत कर्तव्ये व जबाबदारी पार पाडण्याकरीता आहरण व संविरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. त्यामुळे, यापुढे सर्व विभागीय मंडळांतून विभागीय सहसचिव हे पद रद्द करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४२४१२३६२२५८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by MOHINUDDIN B TASHILDAR
Date: 2026.04.24 12:37:56 +05'30'

**( मो. बा. ताशिलदार )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) शिक्षण संचालक (प्राथमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) शिक्षण संचालक (योजना), योजना संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र , पुणे.
७) राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
८) सर्व विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे.
९) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१०) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/योजना).
११) शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने.
१२) निवड नस्ती/प्रशा-५.